

R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५३ वे, अंक ११वा, मुंबई । जानेवारी २०२३
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 53, Issue : 11, Mumbai I January 2023
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## मनोगत

**प्रभाकर कुलकर्णी**

प्रिय बंधुभगिनींनो आणि मातांनो,

अयं नूतन आंग्लवर्षः भवत्कृत्ये भवत्परिवारकृते च मंगलमयः
क्षेमस्थैर्यारोग्यैवर्याभिर्वृध्दिकारकः भवतु इति प्रार्थना एवं शुभेच्छाः।


आपल्या सर्वांना तसेच कुटुंबियांना आणि मित्रमैत्रिणींना वर्ष २०२३ सुखाचे, समृद्धीचे जावो व आपल्या सर्वांना निरोगी आरोग्य लाभो ही श्रीराम चरणी प्रार्थना.

वर्ष २०२२ च्या १२ व १३ नोव्हेंबर रोजी आपली अखिल भारतीय रौप्य महोत्सवी जागतिक ऋग्वेदी परिषद आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने व सहकार्यामुळे यन भुतो न भविष्यतिल या स्वरुपात यशस्वीपणे संपन्न झाली.

या परिषदेला आपल्या समाजातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून त्यांची समाजाविषयीची आपुलकी व प्रेम तसेच त्यांना भविष्यातील त्यांच्या योगदानाविषयी सर्व उपस्थितांना अवगत केले. हे सर्व मान्यवर शिक्षण, बॅकींग, उद्योग, वैद्यकीय, अभियांत्रिकी, प्रशासकीय सेवा या क्षेत्रातील होते व त्यांनी आपल्या अनुभवाचा फायदा समाजाकरीता करून देण्याचा निर्धार व्यक्त केला. या सर्व मान्यवरांचे मी व माझ्या सहकार्यांतर्फे व्यक्तिशः व पत्राद्वारे आभार मानले आहेत.

या परिषदेला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच देशाचे युवा व्यक्तिमत्व मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी उद्‌घाटन केले होते व त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये ब्राह्मण समाजाबद्दल त्यांचा आदर व अभिमान व्यक्त केला. तसेच ब्राह्मण समाजाचे राष्ट्र उभारणीमध्ये सतत योगदान आहे व आपल्या समाजाने इतर समाजामध्ये मिसळून सर्वांचा उत्कर्ष करता येईल, हा संदेश व्यक्त केला.

या परिषदेला माजी पोलिस महासंचालक (महाराष्ट्र राज्य) श्री. प्रवीण दिक्षित, प्रसिद्ध बँकिंग अर्धतज्ञ डॉ. राराविकर, हिंदुजा समुहाचे वित्तीय संचालक श्री. एस. व्ही. झरेगांवकर, सुप्रसिद्ध अर्थ विश्लेषक व अर्थतज्ञ श्री. उदय तारदाळकर, प्रसिद्ध वास्तुविशारद व वास्तु रचनाकार श्री. अरविंद नांदापुरकर, माजी उपकुलगुरु मुंबई विद्यापीठ श्री. संजय कुलकर्णी, प्रसिद्ध भाषातज्ञ सौ. मंजुषा कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले होते.




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५३वे, अंक ११वा,
जानेवारी २०२२
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
**मो. : ९८६७९९४३८९**

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**



दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in


## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, ठाणे यांच्यावतीने दिनदर्शिका २०२३ चे प्रकाशन व वितरण




## सोलापूर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे दिला जाणारा पुरस्कार स्वीकारताना श्री. रेवणसिद्ध जवळेकर



## कल्याण येथे कै. प्रभाकर संत यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना श्री. मंदार प्रभाकर संत





HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+
Countries
Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire


AADISH IMPEX PRIVATE LIMITED
LIFE CHAMPIONS ECOSYSTEM
पितांबरी
pprom
परिवर्तन™
Transformation is Happening
by
BBN GLOBAL™
IS HERE!
ARE YOU READY TO GROW YOUR BUSINESS?
BOOK YOUR DATES
Sunday 12th & Monday 13th FEBRUARY 2023
At Savitribai Phule Natya Sankul,Dombivli, Dist-Thane, Maharashtra, India
Chief Guest: Padma Vibhushan Dr. Anil Kakodkar (Indian Nuclear Physicist)
EMINENT SPEAKERS
Mr. Satish Marathe Director, Reserve Bank of India
Mr. Deepak Ghaisas Chairman of Genecoval Strategic Services Pvt. Ltd.
Mr. Sanjay Londhe Director & CEO, Ashoka Buildcon Ltd.
Mr. Uday Nirgudkar Independent Director
Mr. Sanjay Khare Branding Guru
For registration and more details visit: www.parivartan23.in
For further any details contact:
Mr. Arvind Korhalkar- 8369931366 / Mr. Vivek Wamorkar- 9819870015
In the chaotic crowd of associations 'Brahman Business Network Global' stands apart because it shows how mutually beneficial results can be created when pursuit of profit is balanced with the interdependent needs of individual, the community and the nation.
With 16+ chapters around the globe and 800+ members, BBNGA members exchanged 10,000+referrals and generated 100+ Crores of Business.
BBNGA aims to enhance presence of Brahman community in MSME, SME, and Large Industries by enhancing connectivity and interaction for ease of doing business.
In this pursuit we bring to you the7th version of Partivartan in coming year i.e., 2023
< TEAM PARIVARTAN >
Adv. MAHESH JOSHI Captain 9223570212
MRS. SHWETA INAMDAR Vice-Captain 9820198166
MR. NITIN ITRAJ Souvenir Head 9324415526
MR. PRABODH TANKHIWALE Communication Head 9892140058
MR. MAKARAND PUNDLIK B2B Head 9967917690
MR. VIVEK WAMORKAR Sponsorship Head 9819870015

या सर्व मान्यवरांनी व्यक्त केलेल्या विचारांवर आधारीत लवकरच आम्ही समाज उत्कर्षाच्या योजना आपल्यासमोर मांडू, त्याला आपल्याकडून योग्य तो प्रतिसाद लाभावा ही विनंती.

या परिषदेस सर्व संलग्न संस्थांचे पदाधिकारी आणि सभासद यांनी उपस्थित राहून समारंभाची शोभा वाढवली. परिषदेस एकूण ६०० च्या वर प्रतिनिधी देशाच्या सर्व राज्यांमधून उपस्थित होते व त्यांनी या परिषदेस सहभाग घेतला.

यया परिषदेस आपल्या समाजातील जेष्ठ व श्रेष्ठ मान्यवरांचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन सत्कार केला.ल या परिषदेमध्ये मुख्यत्वे दोन विषयांवर विस्तृत चर्चा झाली.

१) महिलांच्या समस्या व त्यांचे सबलीकरण यावर सौ. माधवी मोगरकर यांच्या पुढाकाराने उपस्थित राहिलेल्या महिलांचे चार ते पाच गट तयार करण्यात आले होते व त्यांनी महिलांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर त्यांचे विचार व्यक्त केले. जे खरोखर समाजासमोरचे मोठे आव्हान आहे. या संबंधीचा विस्तृत अहवाल सौ. माधवी मोगरकर यांनी या समाचार मासिकामध्ये दिला आहे व पुढील समाचारमध्ये क्रमशः त्या-त्या गटाचे विचार आपल्यासमोर आम्ही प्रस्तुत करु. या सर्व महिलांच्या आग्रहानुसार आपण ०८ मार्च २०२३ हा जागतिक महिला दिवस भव्य प्रमाणात मध्यवर्ती मंडळाच्या सभागृहात साजरा करण्याचे ठरविले आहे. या महिला दिनानिमित्त मान्यवर कर्तृत्ववान व अलौकिक यश मिळवणाऱ्या वेगवेगळ्या क्षेत्रातील महिलांचा सत्कार करण्याचा आमचा मानस आहे. तरी आपल्या विभागात किंवा आपल्या शहरातील ज्या महिलांनी अलौकिक कर्तृत्व बजावले आहे. अशा सर्व महिलांची माहिती २८ जानेवारी २०२३ च्या आत आम्हाला पाठवावी.

२) युवकांचा ब्राह्मण सामाजिक संस्थामध्ये अधिक सहभाग असावा यादृष्टीने कार्यवाही करणे. मला नमूद करायला आनंद वाटतो की, श्री. पूर्णेंद्रू शहापुरकर यांच्या नेतृत्वाखाली बडोद्याच्या युवकांनी परिषद आयोजकांनी दिलेली मोठी जबाबदारी योग्यपणे पार पाडली.

अध्यक्ष श्री. नितिन शहापुरकर, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, वडोदरा आणि महिला अध्यक्षा सौ. माधवी मोगरकर यांच्या नेतृत्वाखाली वडोदरा येथील सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी २-३ महिने अहोरात्र मेहनत करून ही रौप्य महोत्सवी परिषद आखिव रेखीव स्वरुपात साजरी केली त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. या यशस्वी परिषदेबद्दल श्री. व सौ. शहापुरकर, श्री. व सौ. सुरतकर, श्री. व सौ. प्रकाश कुलकर्णी, श्री. रामतीर्थ, श्री. कानडे, श्री. रांजणगावकर, श्री. खिरवाडकर, श्री. टाकळकर, श्री. अविनाश करोडे व इतर अनेक यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

परिषदेची जागा श्री दादा भगवान तीर्थक्षेत्र, केलनपुरी वडोदरा येथील वास्तूच मुळात अतिशय आल्हाददायी व सकारात्मक ऊर्जा देणारी होती व या वास्तूच्या विश्वस्त व कर्मचारी यांचेही याबद्दल मी मनःपूर्वक आभार मानतो कारण यशस्वी आयोजनामध्ये त्यांचे योगदान मोठे होते.

या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी अनेक दानशूर व्याक्तिंनी त्यांचे आर्थिक योगदान दिले आहे. त्यामध्ये मुख्यतः श्री. अतुल खिरवाडकर सीईओ कार्यकारी संचालक कल्याण जनता सहकारी बँक, श्री. झरेगावकर, श्री. मुकुंद कुलकर्णी अध्यक्ष नाशिक संघ, श्री. रविंद्र आवटी प्रसिद्ध पत्रकार, श्री. विलास जोशी ठाणे यांचे खास आभार कारण आर्थिक मदतीमुळे एवढी भव्य परिषद संपन्न होऊ शकली. जीचा खर्च १८ ते २० लाख पर्यंत झाला आहे.

या परिषदेच्या निमित्ताने अध्यक्ष श्री. नितिन शहापुरकर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, वडोदरा यांनी वडोदरा येथे संस्थेच्या मालकीची दहा हजार स्के. फूटची जागा लवकरच घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्याला आपण सर्व व संलग्न संस्था योग्य ती मदत करतील असा मला विश्वास आहे.

या परिषदेच्या निमित्ताने भविष्यात मध्यवर्ती मंडळ खालील योजना राबवू इच्छितो.

१) उच्च शिक्षणासाठी कर्जरुपी शैक्षणिक मदत, २)सर्व सभासदांसाठी सर्व समावेशक आरोग्य विमा योजना, ३) समाजातील उत्कृष्ट काम करणाऱ्या संलग्न संस्थांना समाजोपयोगी उपक्रमांसाठी सहाय्य व मार्गदर्शन.

ही परिषद यशस्वी करण्यासाठी सहाय्य केलेल्या सर्व जाहिरातदारांचे, पुरस्कर्त्यांचे, संलग्न संस्था प्रतिनिधींचे, सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार.

या परिषदेची फलश्रुती म्हणजे आपल्याला काही नवीन धडाडीचे युवा कार्यकर्ते मिळाले. तसेच एकूण परिषदेचे यश बघून पुढील परिषद आयोजन करण्यासंबंधी मध्यवर्ती मंडळात डोंबिवली व नाशिक संस्थेने आमंत्रण दिले आहे.

## दैनंदिन जीवनात मनोबोधाचे महत्त्व

**स. भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

समर्थ रामदास स्वामींनी ३५० वर्षांपूर्वी मनोबोधाच्या माध्यमातून समाजमनाला वळण देण्याचे मोठे कार्य केले. एखाद्या व्यक्तीच्या मनातील विचारांवर त्याचे कर्म अवलंबून असते व कर्मावरच त्याचे भविष्य अवलंबून असते. समाजातील सर्वजणांचे जे विचार असतात त्यावरच समाजाची दिशा व दशा ठरते. मनुष्याच्या मनात अनेक विचार व कल्पना सतत येत राहतात. आपला जो मूळ स्वभाव असतो त्यानुसार हे विचार उगम पावत असतात. विज्ञानाच्या अचेतन मन असे म्हणतात. प्रत्येक मनुष्याचे निर्णय, कृती व ध्येय अचेतन मनाच्या डोहातूनच वर येत असतात. कळत नकळत आपल्या मनावर जे संस्कार होतात त्यातूनच हे अचेतन मन तयार होत असते. यावरून असे लक्षात येते की आपल्या विचारांना अनन्यसाधारण असे महत्व आहे. यात एक चांगली गोष्ट ही आहे की आपण ठरवले तर सचेतन मनातील संकल्पना आपण अचेतन मनात रुजवू शकतो. यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. बहूधा हे ओळखूनच समर्थांनी मनोबोधाची निर्मिती केली असावी. समर्थांचे संपूर्ण वाङ्मय कर्म, उपासना, ज्ञान व वैराग्य या मूलभूत तत्वांवर आधारलेले आहे. मनुष्याच्या मनास सज्जना असे संबोधत समर्थ, आपल्याला आपल्या मूळ तत्वाची म्हणजेच श्रीराम तत्वाची अनेकवेळा आठवण करून देतात.

मनुष्याच्या मूळ व सत्य अशा स्वरुपाची ओळख करून देऊन त्यास योग्य दिशेस वळवून त्यायोगे कर्म करण्यास प्रवृत्त करणे हा समर्थांचा यामागचा उद्देश असावा. ईश्वराच्या प्रेमासाठी ठराविक कर्मांना पुन्हा पुन्हा करुन, ईश्वराच्या भक्तीत लीन होऊन, स्वतःला ओळखण्याची प्रक्रिया म्हणजेच उपासना होय. उपासनेच्या मार्गावर चालत असतानाच आपण निस्वार्थ भावाने ईश्वरावर जर श्रद्धा ठेवली तर आपल्याला ज्ञानाची प्राप्ती होऊ शकते. आपल्या अहंकाराची जाणीव जशी कमी होत जाते तशी ज्ञानाची ओळख होऊ लागते. ज्यावेळी स्व चे भान येते तेच खरे शुद्ध ज्ञान होय. अशा ज्ञानानेच वैराग्याचे बीज मनात उमलते. कुठल्याही कर्माचे कर्तेपण आपल्याकडे नसून आपण ईश्वराच्या हातचे एक साधन आहोत हे लक्षात येऊ लागते. ईश्वराच्या इच्छेशिवाय विश्वातील कुठलीही घटना घडत नाही. तसेच घडणाऱ्या घटना, त्या घटना घडवणारा व घडवण्यासाठी वापरली जाणारी आपल्यासारखी साधने हे सर्व एकच आहेत हे लक्षात येण्यासाठी शुद्ध ज्ञान उपयोगी येते व या ज्ञानाने वैराग्य अंगी बाणते. या पायरीवर मनुष्यास खरा आनंद मिळू लागतो व त्याच्या सर्व इच्छा व आकांक्षांचे प्रयोजनच संपते. हीच मुक्ती आहे.

दैनंदिन जीवनात वागताना जर आपण मनोबोधांना आदर्श ठेवून मार्गक्रमण केले तर अनेक अडचणींपासून आपण मुक्त होऊ शकतो. आजकाल तरुणांनाही आध्यात्माविषयी खूप आकर्षण आहे. अनेक तरुण आपआपल्यापरीने आध्यात्माविषयी माहिती घेत असतात व त्यानुसार उपासनाही करत असतात परंतू कधीकधी संयमाची कमतरता असल्याने अथवा कुठल्यातरी अपेक्षेने उपासना करत असल्याने त्यांना हवे तसे अनुभव किंवा प्रचिती येत नाही. शास्त्रशुद्ध व खात्रीचा मार्ग त्यांना माहित नसल्यानेही त्यांना हवी ती मनःशांती व आध्यात्मिक प्रगती साधता येत नाही.

श्री समर्थ रामदास स्वामींनी स्वतः प्रचिती घेऊन सुचवलेला राजमार्ग असताना आपल्याला इतरत्र शोध घेण्याची गरज उरत नाही. समर्थ वाङ्मय व मनोबोधांचा अभ्यास, चिंतन, मनन व त्यानुसार आचरण केले की आपल्याला प्रचिती आल्याशिवाय राहणार नाही. आजकालच्या वेगवान जगात तरुणांच्या मनाला अनेक प्रलोभने आणि अस्थिर करणारे घटक मोठ्या प्रमाणावर आहेत. व्यसन, आत्महत्या, निराशा इ. अनेक गोष्टींचे मूळ हे अस्थिर मनातच असते. जर आपण मनाची स्वच्छता केली तर आपल्या मनाच्या अनेक व्याधी दूर होऊन, आपला खरा आध्यात्मिक प्रवास सुरू होईल. समर्थांच्या मनोबोधांचा आपण गुगल मॅपसारखा उपयोग केला तर आध्यात्मिक क्षेत्रातील योग्य अशा डेस्टीनेशनवर आपण नक्की पोहोचू अशी मला आशा वाटते.

## धर्म-कर्तव्य

### विजया पांडुरंग कुलकर्णी

धर्म हा शब्द असा आहे. त्यामुळे समाजाततेढ तर उत्पन्न होते. त्यामुळे विषमता वाढीस लागतेत्र धर्म ह्या शब्दाचा अर्थ स्वार्थासाठी कसाही अंगिकारला जातो. धर्माचा खरा अर्थ कर्तव्य असा आहे. धर्म ह्या शब्दाची फोड अशी आहे. धरम म्हणजे मनाला धरून ठेवून आचरण करणे तो धर्म. धर्म हा शब्द आपल्या बोलण्यात पुष्कळदा येतो तो असा. शरीर धर्म, मानवधम्र कुटुंबासाठी धर्म, समाजधर्म, राज्यधर्म शेजारधर्म, हा धर्म कसा अंगिकराचा ते मी इथे सांगण्याचा प्रयत्न करते. शरीरधर्म ह्या धर्म कर्तव्यात प्रत्येक अवयवाचे कर्तव्य कोणत ते पाहू. प्रत्येक अवयवांचे कर्तव्य कोणते ते पाहू. प्रत्येक अवयवांचे कर्तव्य आपण उत्तम तऱ्हेने आचरणात आणले तर संस्कारयुक्त आरोग्यदायक असा मनुष्यधर्माने युक्त मानवनिर्मिती होईल. अशा मानवनिर्मितीची आज देशाला नितांत गरज आहे. मेंदूने उच्चदर्जाचे चांगले विचार अंगी बाणावे, हे मेंदूचे कर्तव्य डोळ्यांनी सतत चांगले बघावे. कानानी चांगले ऐकावे. तोंडाने चांगली उच्च दर्जाची वाणी उच्चारून तिचा सतत उपयोग करावा. उदरात पौष्टिक अन्नग्रहण करून आरोग्य संपदा शरीराला प्राप्त करून द्यावी. हातानी चांगले काही करावे. पायानी सदाचारांनी चालावे. चालताना पायाखाली बघून चालावे. हा सर्व अवयवांचा धर्म, शरीरासाठीचे कर्तव्य होय. ही कर्तव्य अंगिकारली की उत्तम स्त्रीपुरुष बालक तयार होतील. कुटुंबात प्रत्येक व्यक्तींनी आपले कर्तव्य हा धर्म समजून कुटुंब मोठे करावे. पत्नीचे कर्तव्य पतीला काय हवं नको ते पहावे. त्याच्या खाण्यापिण्याची काळजी घ्यावी. घरात पत्नी म्हणून जी मदत हवी असेल तिचा अंगिकार करून सुखी आरोग्यदायक संसाराची मुहूर्तमेढ रोवावी. पतीचे कर्तव्य संसारात अडीअडचणी जाणून घेऊन त्या दूर कराव्या. स्त्री ही क्षणाची पत्नी व अनंत काळाची माता असते. माता म्हणजे आई. आ म्हणजे आकाश, ई म्हणजे ईश्वर. ह्या आईन ईश्वर भरलेला असतो. आई म्हणून मुला मुलीवर उत्तम संस्कार करते. आरोग्यासाठी उत्तम आहार खाऊ घालते. शिक्षण देते. मुलामुलीला उत्तम नागरिक बनवते. प्रेम, दया, क्षमा, शांती आपुलकी,

मान-सन्मान दुसऱ्याबद्दल आदराने वागावे ही शिकवण आई स्त्री कर्तव्य म्हणून पार पाडले. मुलाचे कर्तव्य आईवडिलांच्या आज्ञेत वागून विद्या संपादन करणे. कुटुंबांचा नाव लौकिक वाढवून मोठे झाल्यावर आई-वडिलांची सेवा करणे. आई वडिलांनी लहान असताना ते कष्ट प्रेमाने केले. ह्याची जाणीव ठेवणं हे मनाने मुलानी जाणून उच्च प्रतीचे घरंदाज घराणे हा नावलौकिक मिळवणे हे त्यांचे कर्तव्य. अशी संस्कार युक्त कुटुंब एकत्र येऊन समाज तयार होतो. समाजात वावरताना समाज सुखी राहिला. समाजाला शिस्त लाभेल. समाजातील प्रत्येक व्यक्ती आपलं कुटुंब ह्या भावनेने सर्वांचेआचरण हवे. भारतीय राज्य घटनेनुसार भारतात जन्म घेतलेले भारतीय कुटुंब भारतात कुठल्याही प्रांतात राहनू शिक्षण, काम, व्यवसाया नोकरी करू शकतो. त्यामुळे त्यांचा समाज तयार होतो. अशा समाजाशी एकोप्याने प्रेमाचे बंधन बांधून गुण्या गोविंदाने राहून त्या समाजाचे जे सणवार असतील त्यात भाग घेऊन त्यांना मदत करून आपण सर्व एक भारतीय आहोत. असे कर्तव्य वृत्तींनी वागून मित्रत्व आपुलकी जपली पाहिजे. सर्व समाजातील मुलामुलींच्या गुणांना वाव दिला पाहिजे. प्रत्येक मनुष्य गुण संपन्न नसतो. त्यात दोष असतात. सतत दोषावर टिका न करत आपुलकी, प्रेम, सहवास ह्यांनी एकमेकांना मदत करून सुदृढ समाज केला पाहिजे जेणे करून समाज सुरक्षित समाधानी राहिल. अडीअडचणीत मदत करणे हे प्रत्येकाचे धर्मकर्तव्य आहे. सर्व समाजातील व्यवसायिकांना मदत करून देशाच उन्नती केली पाहिजे. समाज कर्तव्यरूपी धम्र सर्व भारतीयांनी आपला भारत मी भारताचा ही भावना रूढ केली पाहिजे. हेच राज्यधर्म म्हणून उदयाला येईल. देशाचा विकास होऊन सर्वांना कामधंदा मिळाला की गरीब श्रीमंत हा भेदभाव नाहीसा होईल. हेच देश कर्तव्य म्हणून भारत जगात महान राष्ट्र म्हणून उदयाला येईल. आपण राहतो तेथील घरपट्टी पाणीपट्टी, वीजबिल न चुकता भरली पाहिजे. वसाहतीत राहणाऱ्या सर्व रहिवाशांचे कर्तव्य आहे. देशाची प्रगती ही माणसांनी केलेले कष्ट व आर्थिक मदत ह्यावर अवलंबून आहे. भारतात राहणाऱ्याने मी भारताचा भारत माझा ही कर्तव्यभावना अखंड मनात रुजवली पाहिजे. कुलधर्म हे प्रत्येक समाजानी आपल्या घराच्या उंबरठ्याच्या आत केले पाहिजे. सर्व समाजाचे संत श्रेष्ठ गुरू, महात्मे, मानवधर्म पाळा असेच सांगितलं. समाजात तेढ वाढून हिंसा अत्याचार होऊन समाज असुरक्षित होईल असे विचार पसरवू नका. सदैव चंदन उगाळा, वडाच्या पारंब्या होऊन कुटुंब, समाज, सुरक्षित ठेवा. प्रेम, माया, ममता, आपुलकी मानसन्मान सर्व समाजानी वागून आपले कर्तव्य पार पाडावे. ह्यासाठी प्रत्येक समाजातील माणसाच्या मनातील परमेश्वररूपी कर्तव्य सदैव त्याचे सुखसमृद्धी प्रेम आनंद वाढविल. ह्यासाठी कर्तव्य धर्म मनात सदैव वास करू दे हीच निर्गुण परमेश्वर चरणी प्रार्थना.

## फळ-रुची, खाद्य-रीती

**अरुंधती दीक्षित** (मो. : ९८२३०१९५६६)

भारतात ऋतुमानाप्रमाणे विविध फळांची रेलचेल असते. प्रत्येकाची फळ खाण्याची आपली आपली खास रीत असते.

केळ हे काश्मीर आणि थंड प्रांत सोडले तर भारताचं फळ म्हणायला हरकत नाही. केळ खायचा आनंद मात्र प्रत्येक जण वेगवेगळ्या प्रकारे घेत असतो. कोणी थोड थोडं केळ सोलून सालातून मोकळा झालेला गराचा दंडगोल चवीचवीने खात असतो तर कोणी हाताने त्या दंडगोलाचा तुकडा मोडून तोंडात घालत असतो. अशाने केळं उष्टे होत नाही आणि कोणी आले तर त्याच्याबरोबरही शेअर करता येतं.

पण जस जसं केळ संपत येतं तसं Setter किंवा Hound जातीच्या कुत्र्याच्या लांबलचक लोंबत्या कानाप्रमाणे केळाची लोंबती साल कोणा कोणाला आवडत नाही. ते आधीच केळाला पूर्ण सालहीन करून आतील गराचा संपूर्ण दंडगोल हातात धरून आत्मानंदी टाळी लागल्या सारखा खात राहतात. कोणी रस्त्यात केळ विकत घेऊन तिथेच त्याचं पूर्ण साल काढून, ते वाटेतच भिरकावून आपल्याच तंद्रीत केळ खात पुढे निघून जातात.

पेरूवाल्याकडून आपल्याला हवा तसा खोबरी, कडक वा पिकलेला पेरू घेतला की त्याच्याकडूनच सुरीने त्याचे चार भाग करून त्यात आपल्या आवडीप्रमाणे तिखटमीठ घालून घेऊन रस्त्याने गप्पा मारत एक एक फोड खात जावे आणि मधेच मित्र भेटला तर त्याच्याही समोर धरावा. तो एक फोड काढुन घेऊन ऋऋफलयज्ञात'' सामील होतो. पेरूच्या बागेत मात्र झाडाचा आवडता पेरू आपल्या हाताने तोडून सरळ दात रोवून खायला पाहिजे. एकदा आमच्याकडे आलेल्या वयस्कराने पेरूच्या गर, बिया काढून फक्त बाहेरचा भाग खाल्ला तर कोण्या एकाने फक्त गर बियाच गोड असतात बाकी भग खाण्याच्या योग्यतेचा नाही म्हणून टाकून दिला. हे दोघे जर एकाच वेळेला आले तर बरे असे वाटून गेलं.

केशरी रंगावर आलेल्या भरघोस अननसाचे अननसवाला त्याच्या लवलवत्या धारदार लांबलचक सुरीनी सरासर पण अत्यंत नजाकतीने पातळ सालं काढायला लागला की बघत रहायला होतं. सफाईनी त्याची सालं काढली की काटे काढणं म्हणजे अननसावर नक्षीकाम असतं. काट्यांच्या जागी तिरक्या सरींच्या नक्षीची शाल अननसाला अंगभर लपेटली जाते. स्लाइस करून पाहिजेत म्हटलं की एकसारख्या जाडीच्या चांदण्या तयार होतात. ही दातेरी चाकं वा चांदण्या हातात घेऊन खायच्या का त्याचेही चौकोन कापून त्यावर चिजची छोटी पातळ चकती ठेऊन टूथपिकनी टोचून बरोबर खायची ही प्रत्येकाची रीत वेगळी.

डाळींबावर पृथ्वीच्या मेरिडिन प्रमाणे पाच उभ्या चिरा घेऊन त्याच्या छोट्याशा मुकटाभोवती गोल सुरी फिरवून तो काढून तेथे दोन्ही अंगठे घालून फाकवून मग लालबुंद माणिक वाटीत वा काचेच्या बाऊलमधे गोळा करणं झकास वाटतं. आपल्याला थोडं नवीन असलेलं कमलम्/ड्रॅगन फ्रुट थोड ह्याच पद्धतीनी पण चिरा घेतल्यावर साल ओढून काढलं की मोकळं होतं.

सीताफळ मऊ झालं की हातानी थोडं दाबून दोन भाग करून चमच्यानी स्कूप काढून खाता खाता बीया टाकण्याची प्रत्येकाची रीतही वैयक्तिक प्रतिष्ठितपणासोबत बदलत जाणारी.

चिक्कू वा पेरू साल काढून, उगीच कापून खाणारे किचकट प्रकारात मोडतात असं वाटतं.

करकरीत हिरवीगार कैरी, रायआवळे, चिंचेचा आकडा एक डोळा मिटून नुसते किंवा मीठ लावून खायला पाहिजे. पण वाळत घातलेल्या चिंचेतूनच चिंचेचा गोळा चोरूनच खायला पाहिजे.

सुरीनी हापुसच्या आंब्यांचं गोल गोल गोल पट्टीसारखं साल काढत जाऊन नंतर त्या फळाच्या चौकोनी फोडी कापून बाऊलमधे सजवून काटाचमच्यानी खाणं ही जशी आनंददायी रीत असते. तशी कोणाला विळीवर त्याच्या दोन्ही खापा कापून त्यावर सुरीनी चौकट ओढून, बशीत ठेऊन चमच्यानी स्कूप करून तो एक एक आम्र क्यूब खायला आवडतो. आढीतला आंबा साल हातानी ओढून काढल्यावर हातात उरलेला गराचा गोळा सरळ दात उमटवत गट्टम् करणं आणि नंतर कोय चोखत बसणं मुला माणसांना प्रियच असतं तसा तो बिलबिला करून चोखणं स्वर्गस्थित देवांनाही नशिबी नसतं. पायरीचे डझन दोन डझन आंबे पितळी बादलीत पाण्यात थोडावेळ भिजत ठेऊन, त्यांना छान अंगोमंगो घालून, देठाच्या जागी अंगठा ठेऊन त्यांना बिलबिलं करून, त्यांचं नाक साफ करून त्यांचा केशरी रस चांदीच्या जाडजूड पातेल्यात नाहीतर छानशा काचपात्रात काढून पंगतीत पुरीचा चमचा करून खाणं स्वर्गीय आनंद देणारं.

सफरचंद हे फळं आपल्याकडे जरी फोडी करून खात असले तरी सफरचंदांच्या प्रदेशात अख्ख करकरीत सफरचंद दातानी खाणच मंजूर असतं. आपल्याकडे हॉटेलच्या काउंटरवर जशी सुपारी बडिशेप ठेवलेली असते; आणि जातांना ती हातावर घ्यायला परवानगीची गरज नसते तशी, अमेरिकन हॉटेल काउंटरवर बास्केटमधे सफरचंद ठेवलेली असतात. येणाऱ्या जाणाऱ्याने खुशाल उचलून घेऊन खात जावं. सुपारीचा विषय निघाल्यामुळे सांगावसं वाटलं की, कडक सुपारी अडकित्यानी बारीक कातरणारी मंडळी मात्र आता काळाच्या पडद्याआड गेली आणि सुपारी बारीक कातरायची कलाही गेली.

फणस कापावा तो गरे विकणाऱ्या माणसानेच. फणसावर चिरे घेऊन फाकवून दांड्यालगत सोडवत जाऊन मधे दांडा जसाच्या तसा ठेवत कापत कापत कमळाप्रमाणे उमलवत नेलेला फणस कित्येकवेळा दादरला मी काम विसरून बघत बसे.

ताडगोळ्यांचीही तशीच तर्हा. कोवळे ताडगोळे निवडून द्यायचं काम फक्त आपण करायचं. पुढचं कौशल्य विक्रेत्याचं! त्याच्या धारदार कोयत्यानी आतल्या कोवळ्या ताडगोळ्याला धक्का न लावता बाहेरचं जाड साल काढून, कोयत्याची कड हळुवार फिरवत आतले तीन ताडगोळे पूर्वी केळीच्या पानावर काढून सावकाश बांधून दिले जायचे. ह्या ताडगोळ्याचं वरचं पातळ साल काढून तो न फुटता पूर्ण तोंडात घालणं हे कौशल्याचं काम मात्र आपलं! ताडगोळा फुटला तर त्याच्यातील चमचा दोन चमचे गोड पाणी सांडून जातं.

पपईचं बाळंतपण करणं माझ्यासाठी मोठा सुखद अनुभव असतो. चांगल्या आकाराची, पातळ सालीची लाल केशरी, पपई उभी कापली की तिच्या नावेप्रमाणे होणाऱ्या दोन भागांकडे नीट पाहिलं तर एखाद्या मानवी गर्भाशयाप्रमाणेच दिसतं. पपईच्या आतल्या भागावर एक छानसं गुबगुबीत अस्तर वाढलेलं असतं. त्या अस्तरावर पपईच्या प्रत्येक बियांची नाळ जोडली गेलेली असते. स्नायू जसे हाडाच्या दोन्ही बाजूंना बांधले गेलेले असतात त्याप्रमाणे हे अस्तरही मानवी Tendon प्रमाणे असलेल्या जरा जाडसर धाग्यांनी पपईच्या दोन्ही कडांना बांधलेलं असतं. हे धागे सोडवून घेतले तर हे अस्तर हळु हळु पपईच्या पोटापासून विलग करून छान गुंडाळलं जातं. पपईचं पोट जखमी न करता पपईच्या बियांसकट गुंडाळत हे अस्तर सुरी वा चमच्याच्या कडेने सावकाश काढलं तर तिच्या पोटावरील वळ्याही छान दिसतात. जरी ती कापून खायचीच असली तरी तिचं हे साग्रसंगित बाळंतपण मी कौतुकाने करते. फळ खाण्याच्या कौतुकाएवढच त्याचं ड्रेसिंग आनंददायी असतं.

अष्टमीच्या चंद्रासारखी कलिंगडाची अर्धगोल खाप दाढीमिशांवर रसोत्सव करत खायची का बीया बीया काढून, पूर्ण साफसफाई करून चौकोनी तुकडे बाऊलमधे घेऊन खायची हा ही प्रतिष्ठेप्रमाणे बदलत जाणारा विषय! खरबुजाच्या विषुववृत्तावर सुरीने नागमोडी डोंगरा डोंगराप्रमाणे कापत जाऊन सरतेशेवटी दोन केशरी कमळं तयार करण्याची कला फक्त चैत्रागौरीच्या हळदिकुंकवात देवीसमोर मांडतांनाच दृष्टीस पडते.

नारळ, कवठ, बेलफळ ही फोडायला लागणारी फळं. पण त्यातही कोयत्याने नारळावर अचूक मारत दोन सारख्या गोल वाट्या करून त्याच्या पोटातील पाणी हलु न देता हातातील खालच्या वाटीत नारळाचं सगळं पाणी जमा करणं हे ही कलात्मकच! बी न कापता लिंबू कापणं असो, हरबऱ्याचे घाटे न तोडता फांदीवरच सोलून त्यातील हरबरे काढणं असो, ही जर कलाच असेल तर एक विचार माझ्या मनात आल्यावाचून रहात नाही. कुठल्या कर्माचं फळं म्हणून देवानी आपल्याला दिलेलं आयुष्यरूपी फळ तेवढ्याच नजाकतीनी आपल्याला हवा तसा आकार देत, त्याला सजवत सजवत, त्यातील अननसासारखे काटे काढत, नको असलेल्या साली काढत त्याचा मस्त आनंद घेणं हीही कलाच! ती साध्य व्हायला पाहिजे.

# नारीशक्ती

**माधवीताई मोगरकर (मो. ९७२५७०००६६)**

अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, बडोदे यांच्या संयुक्त विद्यमाने बडोदे येथे दि. १२ व १३ नोव्हेंबर २०२२ रोजी झालेल्या अभूतपूर्व अश्या अधिवेशनाच्या निमित्ताने आज जवळ-जवळ दोन महिन्यानंतर हा लेख मी लिहायला बसले. प्रथम तर मी आता काय लिहू? असे वाटत होते. परंतु क्षणभरच आणि लगेचचं मी त्या आठवणीच्या माध्यमात शिरले व सारे जणु आत्ताच घडले असे अनुभवत लिहायला लागले.

प्रथम तर बडोद्याचे आमचे नितिनजी व मुंबई मध्यवर्ती मंडळाचे श्री. प्रभाकर कुलकर्णी व श्री. विलास जोशी व सर्व कार्यकर्त्यांचे मी मनःपूर्वक आभारच मानते. कारण अखिल भारतीय कार्यक्रमात त्यांनी आम्हा महिलांना संपूर्ण एक सत्र देऊन कार्यक्रमाचं आयोजन तुम्ही करा हे सांगुन एक सुवर्ण संधीच दिली अर्थात आम्ही देखील कसोटीला लागलेल्या सोन्याप्रमाणे कसोशीने प्रयत्नास लागलो.

आमच्या पहिल्याच मुंबई भेटीमध्ये देशातील अनेक ठिकाणाहुन आलेल्या बऱ्याच प्रतिनिधि महिला कार्यकर्त्यांनी देखील आमच्या एक आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमाविषयीची कल्पना उचलुन धरली. बडोदे ते मुंबई या प्रवासात माझे बडोद्यातील माझ्या सोबत असलेल्या माझ्या सगळ्यांच मैत्रीणींना सोबत ह्या संदर्भात चर्चा सुरुच होती. त्यानुसार आपल्या कार्यक्रमात अधिवेशनास आलेल्या सर्वच लहान-मोठ्या-थोर-जेष्ठ-श्रेष्ठ महिलांचा भाग असावा असे नक्की झाले व त्यानुसार कार्यक्रम घ्यायचा नक्की केले. परंतु देशप्रेमाने सदैव भारावलेल्या व निष्ठावंत माझ्या आत्म्यास मात्र कुठेतरी आपल्या देशात पुढील काही वर्षात समोर येणाऱ्या समस्या व त्याचा उपाय काय ह्या संदर्भात विचारांच काहुर माजलं होतं.

अनेक वेळा परदेशात जाऊन तेथील घराची ओळख व समाजरचनेतील उणीवा तसेच नेटकेपणा देखील मला जरा जास्तच विचार करायला लावत होता. बिंदुतुन-सिंधुकडे जाणारी स्त्रीयांची समाजातील स्थिती, गति व फरपट मी मनापासुन पहात होते. ह्यातुनच एक विचार प्रबळ झाला व तो सत्यात उतरला, कसोटीला लागला व सोनं ही ठरवला गेला. तोच हा कार्यक्रम म्हणजेच, यमहिला चर्चासत्रल व त्यांचे खेळ कारण अधिवेशनास आलेल्या देशभरातील महिला आपण घर सोडुन जात आहोत तर मागील काळजीही. जिथे जात आहोत तेथील वातावरण व आपली भूमिका ही अनामिक भीती तर काय असेल ही उत्सुकता अश्या विविध भावना मनात घेऊन आलेल्या असणार. ह्या साऱ्यांचा विचार करून व येणाऱ्या काळात समाजासमोर प्रकर्षाने जाणवणारे प्रश्न-समस्या व त्यावरचे उपाय ह्याचा विचार, त्याचबरोबर संसारातील विवंचना विसरुन अगदी मनापासुन खेळ खेळुन आपला तणाव नकळतच नाहीसा झाला. ही जाणीव घेऊन परत जाणाऱ्या भगिनी ही आमची संकल्पना आपल्या सोबत विचारांची शीदोरी घेऊन जाणाऱ्या प्रत्येक भगिनीच्या चेहऱ्यावर एक समाधानाची, आपुलकीची, उत्साहाची, स्वतःची ओळख पटल्याची खुण असलेली खुशीची लहर आम्हांला सगळ्यांना जाणवत होती. कारण ही तसेच होते. चर्चासत्रासाठी निवडलेले विषय हे विविधांगी होते. अगदी स्वयंपाक घरातील विज्ञान ते आजची आधुनीक स्त्री, लिव्ह इन रिलेशनशीप ह्या सारख्या विषयाची त्यांच्या नेमुन दिलेल्या ग्रुप बरोबर चर्चा. त्यात १५ विषय घेतले होते. परंपरागत दागिने, खेळ, समाजातील विधवा भगिनी, कुटुंबासाठी किंवा करीयर साठीही तारुण्याचा भोग देणाऱ्या प्रौढ, कुमारिका परित्यकत्या ह्यांना कायद्याने मान्यता दिली असली तरी ह्याचे स्थान, सरोगसी असे बरेच विषय ह्या माध्यमातुन चर्चेस उतरले. ह्या सत्रात भाग सर्वच भगिनींनी

घेतला. त्यात १८ वर्ष वयापासुन ते ८२/८५ वर्षाच्या काकुंपर्यंत तर विविध शहरातुन आलेल्या, खेड्यातुन आलेल्या, विविध परिस्थितीतील भगिनी, आर्थिक असमानता असलेल्या, विविध क्षेत्रातुन डॉक्टर, इंजिनीयर, वकील अश्या मान्यवर असलेल्या तर अध्यात्मिक, राजकीय, सामाजिक अश्या विविध माध्यमातुन कार्य करणाऱ्या भगिनी, तसेच सासुबाई-सुनबाई-मुलगी अश्या विविध भूमिका असलेल्या आम्ही सगळ्याचजणी ह्या कार्यक्रमाचा एक भाग झालो. चर्चा खूप छान रंगली. प्रत्येक गटाच्या प्रमुख महिलेने त्यांना दिलेल्या वेळात आपल्या गटात काय चर्चा झाली व त्याचा निष्कर्ष काय निघाला हे थोडक्यात सांगीतले. अहो काय सांगु, स्वयंपाक घरातील विज्ञान हा विषय ज्या गटाकडे चर्चेसाठी होता त्यात एक ८२ वर्षाच्या काकुंनी त्यांच्या गटाचे प्रतिनिधित्व केले. त्यांचे विचार मांडतना त्यांनी अगदी स्वयंपाक घरातील भांड्यांपासुनच सुरुवात केली. त्यांना वेळ अपुरा पडला. तरीही त्यांचा उत्साह पाहुन आम्ही साऱ्याजणी स्तिमित झालो. अर्थात वेळेचा अभाव साऱ्यांनाच नडला. पण खुप वर्षानी साऱ्याजणी बोलत्या झाल्या ह्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता व त्याचे समाधान आयोजकांच्या मनात ओसंडत होते.

महिलांचे खेळ मात्र वेळे अभावी घ्यायचे राहीले ह्याची खंत मात्र सतत राहणारच आहे. तरीही विविधतेन नटलेलं हे अधिवेशन मात्र आजिवन स्मरणात त्याच्या गोड आठवणी घेऊन कायमच अंकित झाल आहे.

ह्या चर्चासत्रातील विविध विषयांचे अभ्यासपूर्ण लेख आपण पुढील काही महिने आपल्या मासिकातुन पाहाणारच आहोत.

परंतु पुन्हा एकदा सांगावेसे वाटते - 'यत्र नार्यस्तु पुज्यते रमन्ते तत्र देवताः'

## संलग्न संस्था वृत्त

**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, भुसावळ आयोजित उत्तर महाराष्ट्र देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज बांधव अधिवेशन व श्रीगणेश याग**

शनिवार दि. २८ जानेवारी २०२३, कार्यक्रमाची वेळ : सकाळी ०७ ते १० - श्रीगणेश याग, सकाळी १० ते १२ - समाज प्रतिनिधींचे अधिवेशन चर्चा सत्र, दुपारी १२ ते ०२ - पूर्णाहुती व प्रसाद भोजन

स्थळ : स्वा. सावकर मध्यवर्ती राष्ट्रीय प्रबोधन संस्था पंचवटी प्रकल्प, कल्पना पार्क, प्लॉट नं. २८/२९, सर्व्हे नगर ८९, मिरगव्हाण जामनेर रोड, साई मंदिरामागे, भुसावळ येथे दि. २८ जानेवारी २०२३ रोजी नगर, नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगाव या चार जिल्ह्यातील म्हणजेच उत्तर महाराष्ट्रातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज बांधव प्रतिनिधींचे अधिवेशन व श्रीगणेश यागाचे आयोजन केले आहे. ऋग्वेदी ब्राह्मण समाजासह समस्त ब्राह्मण समाचाजे एकत्रीकरण संम्मेलन यामध्ये वधू-वर सूचक यादी, युवक-युवती रोजगार संदर्भात यादी, शेतकरी ब्राह्मण व अल्पभूधारक यांचे संघटन, समाजातील पौरोहित्य वर्गाचे संघटन करुन यांना समाजातील तज्ञ व अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन प्राप्त होणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. विास जोशी, अध्यक्ष अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई, श्री. प्रभाकर कुलकर्णी, कार्याध्यक्ष, श्री. मिलिंद सरदेशमुख, संपादक समाचार, श्री. नितिन शहापुरकर, अध्यक्ष देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, बडोदे यांचे मार्गदर्शन होणार आहे. या कार्यक्रमास आपण सर्वांनी सहभाग नोंदवावा ही विनंती.

* * *

**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, डोंबिवली संस्थेचे स्नेहसंम्मेलन २०२३**

रविवार दिनांक २९ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ०९ ते ०३ या वेळेत संपन्न होत आहे. समारंभाचे

अध्यक्ष श्री. शरदचंद्र विठ्ठल झरेगावकर (मुख्य वित्तीय अधिकारी व कार्यकारी उपाध्यक्ष इंडसइंड बँक मुंबई) प्रमुख अतिथि डॉ. मंजुषा कुलकर्णी (साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या), सन्माननीय अतिथी विलासरोव जोशी, अध्यक्ष व श्री. प्रभाकर कुलकर्णी, कार्याध्यक्ष (अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई) हे उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रम स्थळ : दि हेरिटेज एनएक्स हॉल, सिटी मॉल, दुसरा मजला, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व) ४२१२०३.

विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या निवडक सभासद बंधुभगिनींचा योग्य तो सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. या कार्यक्रमास आपली सर्वांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

| **अविनाश कुलकर्णी** | **नरेश कुलकर्णी** | **जे. के. जोशी** |
|---|---|---|
| विश्वस्त अध्यक्ष | कार्यवाह | अध्यक्ष |

* * *

**सोलापूर** : सोलापूर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे दिला जाणारा कल्पतरुकार कै. ल.गो. काकडे पत्रकारिता पुरस्कार या वर्षी पत्रकार रेवणसिद्ध जवळेकर यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. ५ हजार रूपये रोख संशोधन शिष्यवृत्ती, शाल व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. आकाशवाणी सोलापूर केंद्राचे केंद्रप्रमुख राजेंद्र दासरी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, उपाध्यक्ष हरिभाऊ जतकर, महिला अध्यक्षा हेमा चिंचोळकर, सचिव श्याम जोशी आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमात पत्रकार संजय पाठक यांचा त्यांनी लिहिलेल्या तीन पुस्तकाबद्दल 'साहित्यिक पत्रकार' म्हणून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय पत्रकार दत्तात्रय आराध्ये यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. येळेगावकर यांनी केले. पुस्कारप्राप्त जवळेकर यांचा परिचय उपाध्यक्ष शंकरराव कुलकर्णी यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यवाह श्याम जोशी यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. नभा काकडे यांनी केले. कार्यक्रमास विजय कुलकर्णी, सुशांत कुलकर्णी, प्रा. किरण कुलकर्णी, सतीश पाटील, तेजा कुलकर्णी, सुनिल हरहरे, रंगनाथ जोशी, श्रीपाद परळीकर यांचे सहकार्य लाभले

**ठाणे** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ ठाणे यांच्या वतीने सन २०२३ या वर्षीचा दिनदर्शिका प्रकाशन सोहळा ठाणे येथील काशिनाथ घाणेकर सभागृहात मोठ्या उत्साहात आज पार पडला. या दिनदर्शिकेचे प्रकाशन प्रसिद्ध अभिनेते आणि दिग्दर्शक श्री. मंगेश देसाई आणि प्रसिद्ध दिग्दर्शक विजू माने यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष तसेच ठाणे परिवहन समितीचे अध्यक्ष, माननीय विलास जोशी तसेच अ. दे. ऋ. ब्रा. समाचारचे संपादक आणि विश्वस्त मिलिंद सरदेशमुख, ठाणे संस्थेचे सचिव श्री प्रसाद ठकार, सौ माधवी सरदेशमुख हे उपस्थित होते. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था ठाणे यांच्यावतीने सतत १० वर्षे हे कार्यक्रम राबवीत असून ठाणे जिल्ह्यातील ब्राह्मण समाजातील सर्व लोकांच्या घरी ही दिनदर्शिका पोहोचणार आहे. अनेक मोफत आरोग्य शिबीर, वंचित समाजास अन्नदान, तसेच गोर गरीब विध्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप असे अनेक सामाजिक कार्यक्रम या संस्थेतर्फे राबविले जातात असे श्री विलास जोशी अध्यक्ष यांनी या प्रसंगी सांगितले. या दिनदर्शिकेच्या प्रकाशन सोहळ्यास ठाणे परिवहन समितीचे सदस्य, नाट्य क्षेत्रातील कलाकार श्री. मिलिंद रघुनाथ मोरे, दिलीप कानडे, तानाजी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. मिलिंद सरदेशमुख यांनी केले.

## PARIVARTAN 2023 - A Business Conference

**Date:** Sunday 12/February/2023 & Monday 13/February/2023

**Venue:** Savitribai Phule Auditorium, Dombivli (East)

Every year BBN Global Association organizes an Annual Conference where the members, visitors come together with their versatile business profile to explore business opportunities/ requirements with fellow members of the organization. It is a Mega Investment Summit; meeting business needs of small to large businesses in every aspect. So intent is to strengthen & Grow Brahmin Entrepreneurship. This will be our seventh Annual conference.

Theme of the conference will be 'Vichar, Vyavhar, Vikas' leading to 'TRANSFORMATION'.

**Vichar :** We intend to spread and strengthen the Vichar of entrepreneurship, especially Brahmin Entrepreneurship, Thoughts of Entrepreneurial Acumen, Invention & Innovation Amongst Brahmin Entrepreneurs.

**Vyavhar :** Vyavhar of Healthy Business Culture amongst them. Instead of Competition, Culture of Complimenting. Also Vyavhar in terms of Financial Transactions.

**Vikas :** Overall Vikas, Brahmin Community and Brahmin Entrepreneur's Growth as a Businessman as well as their personal development.

For more details and online registration: www.parivartan23.in

Contact: Mr. Vivek Wamorkar -9819870015, Mr. Arvind Korhalkar- 8369931366

---

**WHAT IS BBNGA? BBNGA - Brahman Business Network Global Association**

BBNGA is a business networking platform that works with the sole objective to help Brahman Entrepreneurs excel in their business. BBNGA works through 23 Chapters across India and also has 3 chapters in Australia, Dubai & America respectively.

Structured Weekly Meetings are conducted in each chapter which help strengthen the bond amongst members.

**Benefits awarded to BBNG Paid Members -**

- Opportunity to introduce your business to all members in weekly meetings. Get reference and business from fellow members, guest speakers and invited industrial and business tycoons.
- Free posting of Advertisement of your business on BBNG Facebook Group (81,000 Followers). Free Full-page advertisement of your business on BBNG Web Portal (www.bbnglobal.net)
- We also have an official BBNG App which acts as a business portal for all paid members.
- BBNGA International CONFERENCE - Parivartan the Flagship event held every year.

● Various events like Great Bhet, Seminars, Exhibitions, Grand Visitor Day, etc. are conducted throughout our 25 Chapters.

● So to experience first-hand how the power of networking helps you to grow your business multifold, Join BBNGA today.

For More Details please connect: Mr. Vivek Wamorkar -9819870015, Mr. Arvind Korhalkar- 8369931366

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळास मिळालेल्या देणग्या

- श्री. सुर्यकांत राजाराम पुंडे, अहमदनगर यांसकडून कै. लिलावती राजाराम पुंडे यांचे स्मरणार्थ रु. २१,०००/-
- श्री. शशांक सुर्यकांत पुंडे, अहमदनगर यांसकडून कै. राजाराम बळवंत पुंडे यांचे स्मरणार्थ रु. ११११/-
- श्री. गोविंद जहागिरदार, हैद्राबाद यांसकडून रु. २१,०००/- + रु. २१,०००/-
- श्री. मिलिंद प्रभाकर कुलकर्णी, मुलुंड यांसकडून रु. १०७१/- (वाढदिवसानिमित्त)

वरील देणगीदारांनी मध्यवर्ती संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.

## श्री समर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचा आगमन सोहळा



रामदासी श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड या संस्थेतर्फे श्री समर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचे आगमन दि. ०४ जानेवारी २०२३ रोजी झालेले आहे. दि. १६ जानेवारी २०२३ पर्यंत अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, लक्ष्मीनारायण बाग, दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०१६ येथे दर्शनासाठी उपलब्ध आहेत. या दिवसांत श्री समर्थ पादुकांसमोर सज्जनगडावरील दैनंदिन कार्यक्रम, प्रवचन, पूजा, अर्चा, उपासना तसेच कीर्तन, भजन इत्यादी कार्यक्रम होणार आहे. मुंबई विभागातील समस्त जनतेने या अलौकिक दुग्धशर्करा योगाचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

संपर्क क्र. : ०२२-२४३०२२७३/२४३०७५७३

***सर्व देशबांधव बंधु-भगिनींना मकर संक्रांतीच्या आणि प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. प्रजासत्ताक दिन चिरायु होवो.***

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे यावर्षीही माघी गणेशोत्सव दि. २५.०१.२०२३ रोजी साजरा करण्यात येणार आहे. सर्व बंधु भगिनीनी या सार्वजनिक उत्सवात सहभागी व्हावे.**

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे**.......................................................................................................................

● नाव – **ओमकार मधुसूदन जोशी**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – १५.०९.१९९५, जन्म वेळ – दुपारी १२.१०, जन्म स्थळ – नालासोपारा, गोत्र – भारद्वाज, रास – वृषभ, नक्षत्र – रोहिणी, प्रथम – चरण, गण – मनुष्य, नाडी – अंत्य, रक्तगट – O+ve, मंगळ – आहे, उंची – ५.६, शिक्षण – BMM (Mass Media) + Travel Tourism, नोकरी – Visa Executive at Thomas Cook (India) Ltd; Mumbai, वार्षिक पगार – ४ लाख, अपेक्षा – प्रथम वधू-शक्यतो स्वजातीय, उंची ५.४ पर्यंत, वयात ३-४ वर्षे अंतर अपेक्षित, पदवीधर-नोकरी करणारी, एकत्र कुटुंबात राहण्याची सवय, पत्रिका पहायची आहे. संपर्क – मधुसूदन जोशी ९८२१०८६५९१, ९९६०८५९७५२, ९१५८४५७२३१, पत्ता – प्लॉट नं. २६, विद्या-मेधा, विवाकुटीर, रोठा फाटक, केळवे रोड (पूर्व), तालुका-जिल्हा-पालघर-४०१४०१.

● नाव – **शुभंकर अरविंद सकळकळे**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २०.०८.१९९४, रक्तगट – O+ve, गोत्र – भारद्वाज, रास – मकर, नक्षस्त्र – श्रवण, अन्त्य नाडी, देव गण, चतुर्थ चरण, उंची – ६, बांधा – मध्यम, वर्ण – निमगोरा, जन्म स्थळ – जळगाव (खान्देश), शिक्षण – B.E. (Electronics & Tele Communication), नोकरी – IT Company, New Jersey America, अपेक्षा – अनुरुप, समव्यवसायाची व इतर व्यवसायातील चालेल, उच्चशिक्षित, नोकरी करणारी वा इच्छुक, संपर्क – अरविंद रामचंद्र सकळकळे ९९६९७२६१९५, सौ. सुलभा अरविंद सकळकळे ९८६९९८२४०५, पत्ता – इमारत क्र. १८, ए विंग, फ्लॅट नं.१०२, अजिंक्य को.ऑ.हौ.सोसायटी, बिंबीसार नगर, गोरेगांव (पूर्व), मुंबई

● नाव – **आनंद विजय चाव्हरे**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २०.०९.१९८९, शिक्षण – १२ वी कला, नोकरी – सहकारी बँक, कल्याण, गोत्र – वसिष्ठ, उंची – ५.५, चष्मा – नाही, वर्ण – गहू वर्ण, जन्म स्थळ – वरळी, मुंबई, बांधा – सडपातळ, रास – वृषभ, नक्षत्र – कृतिका, गण – राक्षस, नाडी – अंत्य, चरण – चतुर्थ, मंगळ – नाही, वडिलांचे नाव – विजय शांताराम चाव्हरे, आईचे नाव – जयश्री विजय चाव्हरे ८१०८७३५११८, पत्ता -ब-४०५, दैवराय सहकारी गृह संस्था, बाजार पेठ, पोलिस स्टेशन समोर, दुधनाका, कल्याण (पश्चिम) ४२१३०१. अपेक्षा – समकक्ष, गृहकृत्य दक्ष, कुठल्याही शाखेची चालेल, वयात अंतर चार ते पाच वर्षे.

● नाव – **ईशान सुनिल कुलकर्णी**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २९.११.१९९३, जन्म वेळ – सकाळी ०९.०१, जन्म स्थळ – डोंबिवली, गोत्र – शांडिल्य, रास – वृषभ, नक्षत्र – रोहिणी, प्रथम – चरण, गण – मनुष्य, नाडी – अंत्य, वर्ण – गहू वर्ण बांधा – मध्यम, चष्मा आहे, शिक्षण – BE (MECH); MBA (Mktg.), नोकरी व ठिकाण/हुद्दा (पोस्ट) – Lecturar in M/s. Jamboree Edu. Pvt. Ltd. Thane सर्वसमावेशक वार्षिक उत्पन्न – ८ लाख, अपेक्षा – सुयोग्य, अनुरुप, समकक्ष, संपर्क – सुनिल गोविंद कुलकर्णी ९८६९३००३२३, सौ. नेहा सुनिल कुलकर्णी ९३७२४९३०९०, पत्ता – ब/१०२, साई वैभव सहकारी गृह. संस्था, इंदिरा हॉस्पिटल जवळ, गावदेवी चौक, कल्याण (पश्चिम) ४२१३०१.

● नाव – **प्रथमेश नागेश कुलकर्णी**, जन्मतारीख – १५.०१.१९९५, जन्मवेळ – दुपारी २.२०, जन्मठिकाण – डोंबिवली, रास – मिथुन, गण – मनुष्य, गोत्र – कश्यप, शाखा – देशस्थ ऋग्वेदी, नक्षत्र – आद्रा, चरण – चतुर्थ, नाड – आद्य, उंची – ५.३, शिक्षण – एम.बी.ए. फायनान्स्, नोकरी – विप्रो टेक्नॉलॉजिस, हिंजेवाडी, पुणे, मासिक प्राप्ती – रु. २२,६००/-, अपेक्षा – किमान पदवीधर, अपेक्षा – अनुरूप, सुस्वभावी, कुटुंबवत्सल, पदवीधर किंवा उच्च पदवीधर, संपर्क – नम्रता कुलकर्णी (आई) ७८७५४९०९९९, ९६६५६१९१९१,

● नाव : **निनाद गिरीश कुलकर्णी**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – ०१.०१.१९९२, गोत्र – मुनीभार्गव, वर्ण – गोरा, रक्तगट – B+ve मंगळ – नाही, उंची – ५.४, बांधा – मध्यम, शिक्षण – B.E. (Elc), नोकरी – TCS, रास – वृश्चिक, गण – देव, नाडी – मध्य, चरण – प्रथम, अपेक्षा – अनुरुप, नोकरी, पदवीधर, संपर्क – ९३२६३१५७८२ / ९८६९५६३६०३, पत्ता – १८०५/१८ वा मजला, श्री जयंत गणेश कृपा, सदाशिव क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई ४००००४.

● नाव : **अनिकेत अतुल जोशी**, ब्राह्मण पोटशाखा – शुक्ल यजुर्वेदी, जन्मतारीख – २३.०१.१९९५, गोत्र – वत्स, वर्ण – गोरा, रक्तगट – A+, मंगळ – नाही, उंची – १६५ सेमी, बांधा – मध्यम, शिक्षण – १२ वी पास, नोकरी व ठिकाण/हुद्दा (पोस्ट) – समर्थ सहकारी बँकेत शिपाई पदावर कामाला, मासिक उत्पन्न रु. २०,०००/-, अपेक्षा – मुंबईत जॉब करून रहायला होकार असला पाहिजे, संपर्क – ९००४९६४७२१, ९८६७३२७०४१, पत्ता – के/३०४, सोनम गोदावरी, पी/६, ओल्ड गोल्डन नेस्ट, मीरा रोड (पू.)

● नाव – **प्रथमेश किशोर शेंदुणीकर**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २४.०९.१९९२, गोत्र – अगस्ती, वर्ण – गोरा, नाडी- अंत्य, उंची – ५.९, बांधा – सडपातळ, शिक्षण – बीकॉम, एम.बी.ए. मार्केटींग, मासिक उत्पन्न रु. २०,०००/-, अपेक्षा – किमान पदवीधर, नोकरी करणारी किंवा तयार असणारी, संपर्क – ९४२३९७०४९७, पत्ता – तळमजला, अथर्व सहकारी गृह संस्था, भगवंत नगर, मुंबई नाका, नाशिक ४२२००९.

● नाव – **योगेश विनयकुमार देशपांडे**, ब्राह्मण पोटशाखा – देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख – २०.०८.१९९१, गोत्र – गौतम, वर्ण – गोरा, रक्तगट – $B^{+ve}$, नाडी – आद्य, उंची – ५.५, बांधा – सडपातळ, शिक्षण – डिप्लोमा-इन-ऑटोमोबाईल इंजिनिअरींग, वार्षिक उत्पन्न रु. ४ लाख, अपेक्षा – प्रथम वधु, उंची ५ ते ५.४ वय २७ ते ३० मध्ये, अनुरुप, शिक्षणाची अट नाही, नोकरी करणारी किंवा करण्याची तयारी असावी, संपर्क – विलास देशपांडे ९४२३५८२५१६, पत्ता – चाफेकर चौक, चिंचवड, पुणे.

(**टीप** : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील.)

MRH

**painttech**
CONSULTANTS



**Generations Technology** Changes BUT **HULYALKAR SAME**

**Mukund R. Hulyalkar**

Visits:
**By Appointment Only**
Available on Phone
9.00 a.m. to 6.00 p.m. (For local)
10.30 p.m. to 11.30 p.m. (For outstation)

**Acrylic Distemper**
**2**
**Zinc Silicate**

**Complete Paint World**
**"Choice of Bright People"**

**NATIONALIST CONGRESS PARTY**

**Mukund R. Hulyalkar — Paint Technologist**

Vice-President: South Central Mumbai Dist

| | | |
|---|---|---|
| **Hon. Editor** | : | Paint India |
| ***Secretary*** | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| **President** | : | Deshastha Rugvedi Brahman Sangha, Dadar |
| ***I P President*** | | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| ***Patron Member*** | : | Winner's Academy - Thane |
| ***Member*** | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| ***Award*** | : | ISSPA Mitra Award (2012)<br>Udyogshree By Maharashtra State Government |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile: 9821099494 • Tel.: 022-24456214 • Fax.: 022-24314865
E-mail: painttech_con@yahoo.com • Website: www.painttechconsultants.com

*With*
*Best*
*Compliments*
*From*



S E

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**
Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

*Best wishes from*

Reg. No. AR9/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELAGAVI.

1996-2021

**HEAD OFFICE :**
"Samarth Sadan", Gurukrupa complex,
1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI - 01.
Phone : 0831-2431357, 2403968
e-mail : samarthsociety@yahoo.com
Website : www.samarthsociety.co.in

**R C NAGAR BRANCH :**
"Bhagirathi" R.S. No. 731/D-2,
'C' Scheme, Channamma Nagar,
Main Road, BELAGAVI - 06.
Phone : 0831-2443181

**TILAKWADI BRANCH :**
"Classic Plaza" CTS 44/A2,
Somwarpeth, Tilakwadi,
BELAGAVI - 06.
Phone : 0831-2430357

**SHAHAPUR BRANCH :**
CTS 1103, 1st Floor,
Bichu Galli, Shahapur,
BELAGAVI - 03.
Phone : 0831-2431257

**KHANAPUR BRANCH :**
1524/A6, Mannerikar Building,
Beside State Bank,
Belagavi-Goa Road, KHANAPUR.
Mob. : 6363090655

## UNIQUE DEPOSIT SCHEME WITH ATTRACTIVE RATE OF INTEREST

### AKSHAY DEPOSIT

| | | | Regular | For Senior Citizen |
|---|---|---|---|---|
| 1) | 46 days to 180 days | ... | 6.00% p.a. | -- |
| 2) | 181 days to 364 days | ... | 6.50 p.a. | -- |
| 3) | 1 Year | ... | 8.00% p.a. | 9.00% p.a. |
| 4) | 2 Years | ... | 9.00% p.a. | 10.00% p.a. |
| 5) | 3 Years | ... | 10.00% p.a. | 11.00% p.a. |

**KALPATARU DEPOSIT : Double in 84 Months**

**GOLD LOAN 12.00% p.a.**

### LOAN SCHEMES

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Personal Security Loan | ... | 16.00% p.a. |
| 2) | Mortgage / Hypothecation / Business / Cash Credit / Govt. Security / Education Loan | | |
| | * Up to Rs. 10 Lakhs | ... | 14.25% p.a. |
| | * Above Rs. 10 Lakhs & upto Rs. 25 Lakhs | ... | 14.50% p.a. |
| | * Above Rs. 25 Lakhs upto Rs. 50 Lakhs & Above | ... | 15.00% p.a. |

### NIRANTAR (Recurring Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 1 Year | 8.00% p.a. |
| 2) | 2 Years | 9.00% p.a. |
| 3) | 3 Years | 10.00 p.a. |

### MADHU SANCHAY (Pigmy Deposit)

| | | |
|---|---|---|
| 1) | 6 Months | 3.00% p.a. |
| 2) | 1 Year | 4.00% p.a. |



**Ajay A. Sunalkar**
Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Ganapat A. Kulkarni
Abhay V. Joshi
Sou. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh Sunagar
Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Sou. Chaya N. Joshi
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri



**Suhas R. Kulkarni**
Vice Chairman

Arvind S. Kulkarni (Secretary)

Raghavendra S. Kesnur (Gen. Manager)

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH